# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या २३व्या स्थापना दिनानिमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन**

28 फेब्रुवारी 2002 साली स्थापन झालेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या २३व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी महापालिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) कार्यालयात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा. आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. महाराष्ट्र राज्य गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. त्यानंतर महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवणारे विविध लोकगीते, भक्तिगीते, कोळीगीते, देशभक्तीपर गीते, पोवाडे, एकपात्री अभिनय, भजन, अभंग यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले आणि त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांनी समाधान व्यक्त करत, महानगरपालिकेचा स्थापना दिन भविष्यातही या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्याचा संकल्प व्यक्त केला. याप्रसंगी उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, मुख्यलेखाधिकारी कालिदास जाधव, मुख्यलेखापरीक्षक सुधीर नाकाडी, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे, सर्व खाते/विभाग प्रमुख, महापालिका अधिकारी/कर्मचारी, शिक्षक/शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.